महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt of Maharashtra Undertaking)
CIN No. U40109MH2005SGC153645

Phone : (P) 26473760, (O) 26474211 /26472131
Fax No. 26581083
Website : www.mahadiscom.in
Email Id : ciro@mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग
प्लाट नं.. G-9, प्रकाशगड,
प्रो. अनंत कानेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई- 400 051.

क्र. औसंवि/ब/कोव्हीड सहाय्य/ 13397. दिनांक : 13 AUG 2020

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.
भांडूप / कल्याण / रत्नागिरी / नाशिक / जळगांव / पूणे / कोल्हापूर / बारामती / औरंगाबाद / लातूर / नांदेड / नागपूर / अकोला / अमरावती / गोंदीया / चंद्रपूर.

विषय : कोव्हीड -१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दुर्देवाने मृत्यू झाल्यास सानुग्रह सहाय्य अदा करणेबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. औसंवि/कोव्हीड सहाय्य/११५४५ दि.१९/०६/२०२०.

***********

उपरोक्त संदर्भाकित परिपत्रकान्वये, म.रा.वि. मंडळ सुत्रधारी कंपनी व महावितरण कंपनीत कार्यरत कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावतांना कोविड -१९ या संसर्गजन्य आजाराची लागण होवून उपचारा दरम्यान दूर्देवी मृत्यू घडल्यास संबंधितांच्या वारसास रु. ३० लक्ष इतक्या रक्कमेचे सानुग्रह सहाय्य विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून अदा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, कंपनीत कार्यरत कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावतांना कोविड -१९ या संसर्गजन्य आजारामुळे उपचारा दरमान मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास सानुग्रह सहाय्य म्हणून अदा करण्यात येणारी रु. ३० लक्ष या रकमेवर आयकर कपात करावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून विनंती करण्यात आली आहे.

याबाबत, आयकर विभाग, भारत सरकार (Income Tax Department, Govt. of India) यांनी त्यांचे परिपत्रक क्र. ५७३ दि. २१/०८/१९९० मधील क्र. ३४ अन्वये, एखाद्या कर्मचा-यास आपले कर्तव्य बजावतांना मृत्यू आल्यास त्यांच्या कायदेशिर वारसास अदा करण्यात येणारी कोणत्याही प्रकारची एकमुखी रक्कम (lump sum payment) जे की कृतज्ञतेने, नुकसान भरपाई स्वरुपात किंवा इतर रुपाने अदा करण्यात येते, ती रक्कम करपात्र होणार नाही असे स्पष्ट केले आहे.

त्यानुषंगाने, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कंपनीत कार्यरत कर्मचा-यांना आपले कर्तव्य बजावतांना कोविड -१९ या संसर्गजन्य आजाराची लागण झाल्यास, व त्या उपचारा दरम्यान दूर्देवी मृत्यू घडल्यास विहीत अटी व शर्तीच्या आधारे संबंधितांच्या वारसास सानुग्रह सहाय्य म्हणून प्रदान करण्यात येणारी रु. ३० लक्ष इतकी रक्कम करपात्र होणार नाही किंवा आयकर कपातीकरीता गृहीत धरण्यात येवू नये.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत सविनय सादर :-

१. संचालक (वित्त) / (संचालन) / (मानव संसाधन), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
२. सह व्यवस्थापकीय संचालक, प्रादेशिक कार्यालय, कल्याण / औरंगाबाद.
३. प्रादेशिक संचालक, प्रादेशिक कार्यालय, पूणे / नागपूर.

प्रत रवाना :-

उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, भांडूप / कल्याण / रत्नागिरी / नाशिक / जळगांव / पूणे / कोल्हापूर / बारामती / औरंगाबाद / लातूर / नांदेड / नागपूर / अकोला / अमरावती / गोंदीया / चंद्रपूर.
- उपरोक्तपणे कार्यवाहीकरीता.